**जाहीर निवेदन**

**शुक्रवार, 05 जानेवारी 2024.**

तब्बल चार वर्षांच्या विरामकाळानंतर, नव्या उत्साहाने व जोमाने, शनिवार दि. 03 फेब्रुवारी 2024 रोजी, दुपारी 3 वाजल्यापासून, 'ऑगस्ट क्रांती मैदान' ह्या ऐतिहासिक स्थळी **'मुम्बई क्वियर प्राइड मार्च'** ही आमची पदयात्रा आयोजित होत आहे. ह्यात सामील होऊन लैंगिक अल्पसंख्यकांच्या मानवी हक्कांच्या चळवळीचा भाग बना असे आम्ही आपणास आवाहन करतो.

मुंबईतील अनेक लैंगिक अल्पसंख्यक व्यक्ती व संस्थानी मिळून निर्माण केलेल्या 'मुम्बई क्वियर प्राइड' नावाच्या आमच्या संगठनाने सदर पदयात्रेचे आयोजन केले आहे. ह्याकरताच्या शासकीय पनवानग्यांसाठी आम्ही अर्ज केले असून त्याची माहिती आम्ही यथावकाश माध्यमांद्वारे प्रसारित करू.

'मुम्बई क्वियर प्राइड मार्च' पदयात्रा म्हणजेच –

- लैंगिक अल्पसंख्य समुदायातील बाह्य वैविध्य आणि आंतरिक ऐक्य यांचा उत्सव,
- आमच्या रोजच्या जगण्यातील अडचणी व आव्हाने यांबद्दलची सामाजिक जागरूकता,
- समान विवाह व मुले दत्तक घ्यायचा हक्क ह्यांसारख्या मागण्या,
- भेदभावविरोधी आणि हिंसाचारविरोधी कडक कायद्यांची मागणी,
- ट्रान्सजेण्डर व्यक्तींचे हक्क व कल्याण ह्यासाठी त्यांचा समावेश असणारी सक्रिय मंडळे स्थापून ठोस योजना राबवण्याची मागणी,
- एच.आय.वी. बाधित व्यक्तींना आरोग्यसेवा, शिक्षण, रोजगार व निवास सुगम्य करण्याची आणि त्यांच्याविषयीचे सामाजिक अपसमज व भेदभाव दूर करण्याची मागणी,
- समाजातील सर्वच प्रकारचे भेदभाव व हिंसाचार त्वरित संपवण्याची मागणी.

अनेक प्रतिष्ठित विचारवंत, कार्यकर्ते, कलाकार, नाट्य-चित्रपट क्षेत्रातील व्यक्ती, अभिनेते, इतर सामाजिक चळवळींतील कार्यकर्ते, तसेच मुलांचे पालक, शिक्षक, डॉक्टर, वकील, कॉर्पोरेट क्षेत्रातील व्यक्ती, वाणिज्य व्यावसायिक, इत्यादी अनेक जण आमच्या हक्कांना समर्थन देण्याकरता ह्या पदयात्रेत सामील होतात.

ह्या निवेदनाद्वारे आम्ही सर्व पत्रकार व प्रसिद्धिमाध्यमांतील व्यक्तींना आमच्या संगठनातर्फे ह्या कार्यक्रमाला उपस्थित राहण्याकरता निमंत्रण देत आहोत. तसेच ह्या कार्यक्रमाचे संवेदनशील व योग्य शब्दांत वार्तांकन

करण्याचेही आवाहन आम्ही करत आहोत. ह्या पदयात्रेसंबंधी व आमच्या चळवळीसंबंधी आणखी जाणून घेण्यासाठी आमच्या खालील प्रतिनिधींशी आपण संपर्क करू शकता –

- अंजली सिरोया – 9664075330
- आशिष पंड्या – 9824215449
- सुधांशू लताड – 8698632699
- सुहेल अब्बासी – 9821016939
- सौरभ बोन्द्रे – 9892973091
- विनी चोपरा – 7738498335
- हरीश अय्यर – 9833100340

पदयात्रेच्या महिनाभर आधी ह्याच अनुषंगाने कलाप्रस्तुती, प्रबोधन, चर्चा, कार्यशाळा, चित्रपट प्रदर्शन, कथा, कविता, नृत्यसंगीत, इत्यादी अनेक कार्यक्रम मुंबईत आयोजित केले आहेत. ह्या कार्यक्रमांची पूर्ण तालिका आमच्या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याची लिंक अशी आहे - mumbaiqueerpride.in

पदयात्रेत भाग घेणाऱ्या व समर्थन देणाऱ्या सर्वांना आम्ही नम्र आवाहन करतो की सर्वांनी कायद्याचे पालन करावे. ही पदयात्रा सर्व प्रकारच्या व्यक्तींना सुरक्षित आणि समावेशक वाटावी ह्याकरता कोणत्याही कायद्याचे उल्लंघन न करण्याचे भान राखणे अतिशय आवश्यक आहे.

इतर सामाजिक चळवळींतील कार्यकर्त्यांचे पदयात्रेत स्वागत करतानाच आम्ही हेही स्पष्ट करू इच्छितो  की लैंगिक अल्पसंख्यकांचे मानवी हक्क व त्या अनुकूल उद्दिष्टांसाठीच ही पदयात्रा आहे. आमच्या पदयात्रेतील सर्व व्यक्तींच्या क्रिया, पेहेराव, भाषण, घोषणा, चित्रे, फलक, इत्यादीतील मजकूर आमच्या उद्दिष्टाशीच आनुषंगिक असावा. कोणत्याही व्यक्ती किंवा समूहाविषयी द्वेष, विभाजन, अवमान, मानहानी, भेदभाव, विध्वंस, हिंसा, इत्यादी व्यक्त करणारे विचार, शब्द वा क्रिया ह्यांना आमच्या चळवळीत थारा नाहीच, किंबहुना, अश्या गोष्टींचा मुळातून निषेध करण्यासाठीच आमची चळवळ आहे.

आमच्या कार्यक्रमांत व पदयात्रेत आपल्या उत्साहवर्धक व स्नेहवर्धक सहभागाकरता आम्ही आपले स्वागतोत्सुक असू. लोभ आहेच, तो द्विगुणित व्हावा ही सदाशा.

कळावे,
मुम्बई क्वियर प्राइड.